# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते। मो-9421094991,7264079990



Bharat Chandak

SATYA ELECTRICALS

POLYCAB Racold legrand HAVELLS L&T SWITCHGEAR INDOASIAN

Finolex KOLORS USHA PHILIPS GreatWhite SIEMENS

Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512

Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018

Email:satyaelectricals@rediffmail.com



लातूर | वर्ष : ३ रे | अंक : १०५ वा | मंगळवार दि. ०५ सप्टेंबर २०२३ | पाने : ४ | स्वागत मूल्य : २ रू.


# मराठा आरक्षणाबाबत शासन गंभीर



मुंबई - उच्चस्तरीय बैठक आज पार पडली. जालन्यातील उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्याशी संवाद साधला. जालन्यात जे काही झाले जो काही प्रकार झाला या बाबतीत मी मनोज जरांगे पाटील यांच्याशी बोललो होतो. सरकार गांभीर्याने काम करत आहे. मराठा समाजाची या आधी जी काही आंदोलन झाली ती सर्व शिस्तबद्ध पद्धतीने झालीत, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बैठकीनंतर म्हणाले. मराठा आरक्षणाबाबत मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक आज पार पाडली. त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पत्रकार परिषदेत बोलत होते.

मराठा समाजाची फसवणूक करायची नाही, प्लॅन फूल प्रूफ असावा यासाठी गांभीर्याने प्रयत्न केला आहे. आयोगालाही सूचना देण्यात आलेल्या आहेत. सरकार कुठेही मागे पडणार नाही. आरक्षण देण्यासाठी सरकार बांधिल आहे. मराठा समाज काही प्रमाणात पुढारलेला आहे. पण, मोठ्या प्रमाणात मागास आहे. समाज मागास असल्याचं सुप्रीम कोर्टासमोर सिद्ध करावा लागेल. आरक्षण टिकण्यासाठी फूल प्रूफ योजना हवी, असं शिंदें म्हणाले.

मराठा समाज शिस्त प्रिय आहे. पण, काही लोक वातावरण चिघळवण्याचं काम करत आहेत. त्यांच्या पासून सावध रहा. जरंगे पाटील यांच्या जिवाची काळजी सगळ्यांनाच आहे. त्यांची तब्बेत (पान २ वर)

## झालेल्या घटनेबद्दल क्षमायाचना करतो, क्षमा मागतो-गृहमंत्री देवेंद्र फडणवीस



मुंबई : जालन्यात मराठा आंदोलकांवर झालेला लाठीहल्ला अत्यंत चुकीचा होता. या घटनेबद्दल मी क्षमायाचना करतो. क्षमा मागतो, अशा शब्दांत राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खेद व्यक्त केला आहे. मराठा आरक्षणाबाबत मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक आज पार पाडली. त्यानंतर देवेंद्र फडणवीस पत्रकार परिषदेत बोलत होते. जालन्यातील लाठीमाराच्या घटनेवरून राज्यात जोरदार पडसाद उमटले आहेत. आंदोलकांवर लाठीमार करण्यात आला. त्यामुळे मराठा समाजात संतापाची भावना निर्माण झाली आहे. याचे पडसाद आज मराठा आरक्षण उपसमितीच्या बैठकीत पडले. या लाठीमारावर या बैठकीत चर्चा करण्यात आली. त्यानंतर गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मीडियाशी संवाद साधला. पत्रकार परिषदेच्या सुरुवातीलाच फडणवीस यांनी मराठा आंदोलकांची थेट माफी मागितली. तसेच यावेळी त्यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्यावरही सडकून टीका केली.

## कॉम्प्युटर टायपिंगचा 'श्रीगणेशा' करणारे ॲप ३० वर्षानंतर बंद होणार

नवी दिल्ली : अनेकांना पहिल्यांदा कॉम्प्युटरवर टायपिंग शिकवणारे ॲप मायक्रोसॉफ्ट बंद करणार आहे. जवळपास ३० वर्षांनंतर हे ॲप बंद होणार आहे. मायक्रोसॉफ्टने अधिकृतपणे विंडोज ऑपरेटिंग सिस्टमच्या पुढील रिलीजमधून वर्डपॅड काढून टाकणार असल्याचे म्हटले आहे. वर्डपॅड हे एक विनामूल्य बेसिक वर्ड प्रोसेसर असून जवळजवळ ३० वर्षांपासून विंडोज ऑपरेटिंग सिस्टमचा एक भाग आहे. मूलत: १९९५ मध्ये विंडोज ९५ सोबत वर्डपॅड सादर करण्यात आला होता. तंत्रज्ञान बदलत असताना नव्या ॲप्सच्या गर्दीत वर्डपॅड मागे पडले होते. वर्डपॅड बंद होत असला तरी युजर्सकडे अनेक पर्याय असतील. वर्डपॅड बंद केल्याने फारसा परिणाम होणार नाही.

## विक्रम लँडर निद्रावस्थेत; १४ दिवसांनी पुन्हा होणार कार्यरत

श्रीहरिकोटा : इस्त्रोकडून विक्रम लँडरशी निगडित एक महत्त्वपूर्ण अपडेट आली आहे.



चंद्राच्या पृष्ठभागावर झेप घेतल्यानंतर आता विक्रम लँडरची झोपण्याची वेळ झालेली आहे. ४ सप्टेंबर २०२३ रोजी सकाळी ८ वाजता इस्त्रोच्या वैज्ञानिकांनी विक्रम लँडरचे सर्व पेलोड बंद केले. फक्त लँडरशी संपर्क कायम ठेवण्यासाठी रिसिव्हर ऑन ठेवण्यात आले आहे. ही झोप १४ दिवसानंतर म्हणजेच २२ डिसेंबरला पूर्ण होणार आहे. लँडर पुन्हा १४ दिवसांनी सुखरूपपणे कार्यरत होईल का, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

इस्त्रोकडून लँडरने झेप घेतरल्यानंतरचे छायाचित्र प्रसिद्ध केले आहेत. या छायाचित्रांसोबतच्या संशोधनास उपयुक्त माहिती बंगळूर स्थित इस्ट्रॅक या संस्थेला मिळाला आहे. ही माहिती विक्रम लँडरने निद्रेत जाण्यापूर्वीच पाठवली होती.

# जिल्ह्यात टंचाईची परिस्थिती निर्माण झाल्यास पिण्याचे पाणी, जनावरांसाठी चाऱ्यासाठी नियोजन करावे - ना. संजय बनसोडे




**लातूर** (प्रतिनिधी) : सप्टेंबर महिन्यात अत्यल्प पाऊस झाल्यास पाणी टंचाईची परिस्थिती निर्माण होवू शकते. त्यासाठी जिल्ह्यात पिण्याच्या पाण्यापासून ते जनावरांच्या चाऱ्यापर्यंतचे नियोजन जिल्हा प्रशासनाने अत्यंत काटेकोरपणे करावे, असे आदेश क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी आज येथे दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवन सभागृहात झालेल्या टंचाई आढावा बैठकीत ना. बनसोडे बोलत होते. खासदार सुधाकर शृंगारे, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार अभिमन्यू पवार, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, महानगर पालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे, अपर जिल्हाधिकारी सुनील यादव, निवासी उपजिल्हाधिकारी विजयकुमार ढगे यांच्यासह संबंधित विभागांचे प्रमुख यावेळी उपस्थित होते.

लातूर शहराला रोज ५५ ते ६० दशलक्ष लिटर पाणी लागते. मांजरा धरणातील ६ एमएमक्यूब इतका पाणीसाठा लातूर शहरासाठी आरक्षित आहे. पुढील सहा महिन्यांपर्यंत हे पाणी पुरेल असे नियोजन करण्यात आले असले तरी अनधिकृत पाणी उपसा मोठ्या प्रमाणात होतो. तो रोखण्यासाठी नोटीस देवून कारवाई करावी, असे ना. बनसोडे यावेळी म्हणाले. जिल्ह्यातील अनेक महसूल मंडळांमध्ये सलग ३२ दिवस पावसाचा खंड पडल्यामुळे पिकांचे नुकसान झाले आहे. या नुकसानीचे पंचनामे पीक विमा कंपनीकडून आणि कृषि विभागाकडून (पान २ वर)

# भारतीय बौद्ध महासभा नवी मुंबई जिल्हा शाखेचा वर्धापन दिन संपन्न



नवी मुंबई (के.एच. हनवते) : भारतीय बौद्ध महासभा नवी मुंबई जिल्हा शाखेचा २६ वा वर्धापन दिन नुकताच रविवार दि.३ सप्टेंबर २०२३ रोजी शेतकरी समाज हॉल, कोपरखैरणे येथे दि. बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडीया संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. भीमराव यशवंतराव आंबेडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. त्यावेळी एम. डी.सरोदे (राष्ट्रीय सचिव), भिकाजी कांबळे (अध्यक्ष महाराष्ट्र राज्य), स्वातीताई शिंदे (महिला अध्यक्ष महाराष्ट्र राज्य) यांनी व साहेबांनी उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले. सदर प्रसंगी नवी मुंबई जिल्हा शाखेच्या वतीने डॉ. भिमराव साहेबांना सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले. त्याचबरोबर (पान २ वर)

# सोयाबीन पिकाला २५ टक्के विमा जाहिर झाल्याने शेतकऱ्यांना मिळाला दिलासा





लातूर (प्रतिनिधी) : लातूर ग्रामीण मतदार संघातील लातूर, रेणापुर भागात सर्व महसूल मंडळात गेल्या एक महिन्यापासून पाउस नसल्याने खरीप पिकांचे नुकसान होत असून यामुळे जनावरांचा चारा व पिण्याचा प्रश्न भेडसावत आहे यासाठी लातूर ग्रामीणचे आमदार धीरज विलासराव देशमुख यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे १९ जुलै रोजी पीक विमा नुकसान भरपाई द्यावी यासाठी निवेदन दिले होते. त्या पत्राची दखल जिल्हाधिकारी यांनी घेवून संबधित वीमा कंपनी कृषी विभाग यांना सर्व्हे करण्याचा आदेश दिला होता. त्यानंतर जिल्ह्यातील सोयाबीन पिक वीमा धारक शेतक-यांना २५ टक्के आगाऊ अग्रिम देण्याबाबत अधिसूचना काढली आहे याबाबत लातूर ग्रामीणचे आमदार धीरज विलासराव देशमुख यांच्या पाठपुराव्यामुळे शेतक-यांना दिलासा मिळाला आहे.

विद्यमान खरीप हंगामात शेतकरी बांधवांनी सोयाबीन, तूरीचे उत्पादन घेतले आहे. मात्र, गेल्या एक महिन्यापासून पावसाचा खंड पडल्याने शेतक-यांचे हाताला आलेले पीक गेले आहेत. त्यामुळें शेतक-यांचे अतोनात नुकसान झाले असून यासाठी राज्य शासन जिल्हाधिकारी यांच्याकडे लातूर ग्रामीणचे आमदार धीरज विलासराव देशमुख यांनी अडचणीत सापडलेल्या शेतक-यांना मदत करावी अशी मागणी केली होती. त्या मागणीची दखल घेत सोयाबीन उत्पादक शेतक-यांना २५ टक्के अग्रीम जोखीम भरपाई देण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांनी संबधित पीक विमा कंपन्यांना दिले आहेत, तशी अधिसूचना जारी केली आहे. यामुळे लातूर ग्रामीण मतदार संघातील बहुतांश महसूल मंडळातील शेतक-यांना भरपाई मिळणार आहे. सरकारने भरपाई दिल्याबद्दल लातूर ग्रामीणचे आमदार धीरज विलासराव देशमुख यांनी सरकारचे आभार व्यक्त केले आहेत.


ज्ञान, चारित्र्य व देशप्रेम संवर्धनासाठी शिक्षण...

समाज जागृती शिक्षण संस्था, मुरुड संचलित



संभाजी महाविद्यालय, मुरूड

ता. जि. लातूर





भुगोल विभागाच्या वतीने सर्व शिक्षक बांधवाना शिक्षक दिनाच्या

हार्दिक शुभेच्छा!

"पर्यावरणाचा करूया सन्मान, कारण हेच आहे आपल्यासाठी वरदान"



प्रा.डॉ.एच.एस.वाघमारे
भूगोल विभागप्रमुख व संशोधन मार्गदर्शक



प्रा.डॉ.एस.एन.उबाळे
सहाय्यक प्राध्यापक



प्रा.डॉ.जी.एल.जाधव
प्राध्यापक व संशोधन मार्गदर्शक

# संपादकीय ...

## दुष्काळ आपल्या दारी

मुळातच उशिरा हजेरी लावलेल्या पावसाने ऑगस्टमध्ये पुन्हा दडी मारल्याने जवळपास निम्म्या महाराष्ट्रावर दुष्काळाचे सावट उभे राहिले आहे. तांत्रिकदृष्ट्या अजून पावसाळ्याचा महिना-दीड महिना हाती असला आणि त्या काळात चांगला पाऊस होण्याची शक्यता असली, तरी केवळ सदिच्छांवर विसंबून न राहता संभाव्य स्थितीचा सामना करण्यासाठी तातडीने पुढील नियोजन हाती घेण्याची वेळ आली आहे.

यंदा 'एल निनो'चा फटका बसून देशातील पाऊसमान कमी राहण्याचे अंदाज खरे ठरले आहेत. मुळात गेली काही वर्षे जूनमध्ये पावसाच्या आगमनाचे वेळापत्रक सातत्याने चुकते आहे, त्याची यंदाही पुनरावृत्ती झाली. जुलैमध्ये अनेक भागांत चांगला पाऊस झाला, पण पुन्हा ऑगस्ट महिन्यात त्याने विश्रांती घेतली आहे. एकीकडे उत्तरेकडील राज्यांमध्ये अतिवृष्टी व महापुराचा फटका बसत असताना पश्चिम आणि दक्षिण भारतात सरासरीच्या ४० ते ५० टक्के इतकाच पाऊस झाला. महाराष्ट्रात तर ऑगस्ट महिन्याच्या सरासरीच्या ५६ टक्के, तर एकंदर हंगामाच्या आठ टक्के कमी पाऊस झाल्याचे आकडेवारी सांगते. मराठवाडा, उत्तर व पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भात पावसाने ओढ दिली असून याचा फटका किमान १५ जिल्ह्यांना, म्हणजे जवळपास अर्ध्या महाराष्ट्राला बसला आहे. त्यामुळेच राज्यावर दुष्काळाची छाया गडद झाली आहे. या स्थितीचा पहिला फटका बसला, तो खरिपाच्या पिकांना. पावसाअभावी अनेक भागांमध्ये खरिपाच्या पहिल्या, तर काही भागांत दुबार पेरण्याही वाया गेल्या. तूर, मूग, हरभरा, सोयाबीन, मका आणि कापूस यापैकी काही पिके वाया गेली. आता पाऊस झाला नाही, तर अनेक भागांत पेरलेली पिकेही हातची जाण्याची भीती आहे. दुष्काळी स्थिती कायम राहिली, तर फळबागांनाही फटका बसू शकतो. सुदैवाने देशात अन्नधान्याची टंचाई तीव्र नसल्याने आणि केंद्र सरकारकडून दरमहा धान्य मिळत असल्याने त्याबाबत चिंता नाही. मात्र, नगदी पिके हातून गेल्याचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसू शकतो. दुसरी चिंता उभी आहे, ती पिण्याचे पाणी आणि चाऱ्याची. मराठवाड्याला या स्थितीचा सर्वाधिक फटका बसण्याच्या बेतात असून अनेक भागांत आताच टँकरने पाणी पुरविण्याची वेळ आली आहे. नाशिक भागातही पुरेसा पाऊस न झाल्याने जायकवाडीसारख्या धरणांमध्ये निम्माही साठा नाही. हीच स्थिती उजनीसह अन्य मोठ्या धरणांमध्येही आहे. त्यामुळे उपलब्ध पाणीसाठ्याचे नियोजन आताच केले पाहिजे. पुरेसा साठा झाला नाही, तर रब्बी बागायती पिकांनाही फटका बसून उत्पादनावर परिणाम होण्याची भीती आहे. अर्थात या टंचाईपासून आपण वेगळे राहू, असे शहरी भागाने समजण्याचे कारण नाही. जायकवाडीने तळ गाठल्यामुळे छत्रपती संभाजीनगरासारख्या शहरांमध्ये आताच पाच दिवसांनी पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. पुरेसा पाऊस झाला नाही, तर उद्या पुण्या-मुंबईवरही हीच वेळ येऊ शकते. मुख्य म्हणजे दुष्काळी कामांसाठी निधीचे नियोजन आताच केले पाहिजे. दुष्काळी परिस्थितीत स्थलांतर-टंचाई आणि महागाई वाढते, हे लक्षात घेऊन या समस्येचा व्यापक उहापोह झाला पाहिजे.

या स्थितीवर उपाय योजण्याची अपेक्षा असलेल्या राज्य सरकारकडून त्या आघाडीवर तातडीने हालचाली होताना दिसलेल्या नाहीत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्यांना अजित पवार यांच्यासारख्या प्रशासकाची साथ लाभली आहे. या सर्वांना दुष्काळी स्थितीला तोंड देण्याचा मोठा अनुभव आहे. मात्र, सरकार स्तरावर सध्या राजकीय उत्सवी माहोल दिसून येत आहे. ठिकठिकाणी सत्कार समारंभ, मेळावे-प्रतिमेळावे, शक्ती प्रदर्शन आणि 'शासन आपल्या दारी' सारख्या कार्यक्रमांचीच धामधूम दिसते. खरे तर प्रशासकीय कामकाजात गती असलेल्या अजित पवार यांचा अशा उत्सवांमध्ये रमण्याचा आणि आरोप-प्रत्यारोप करण्याचा राजकीय स्वभाव नाही. मात्र, नव्या संगतीचा गुण लागून त्यांच्यासह सर्व वरिष्ठ मंत्री राणा भीमदेवी थाटाची भाषणे ठोकण्यातच रममाण आहेत. या स्थितीबाबत सरकारला भानावर आणून योग्य उपाययोजनांसाठी भाग पाडणे, हे विरोधकांचे कर्तव्य. पण तेही टोमणे-वैयक्तिक आरोपांमध्येच मग्न दिसतात. नावापुरते सरकारी कार्यक्रम झाले, तरी बहुसंख्य नेत्यांचा वेळ विरोधकांवर टीकास्त्र सोडण्यातच जाताना दिसतो, हे चांगले लक्षण नाही. दुष्काळाची पहिली चाहूल लागणाऱ्या नोकरशाहीनेही या संदर्भातील नियोजन तयार ठेवले पाहिजे. सध्या जिल्ह्याजिल्ह्यांत सुरू असलेल्या सरकारी कार्यक्रमांसाठी ठिकठिकाणच्या जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून सुमारे शंभर कोटी रुपये खर्च होतील, असा अंदाज असून या नेत्यांची सरबराई आणि नियोजनासाठी सगळ्या यंत्रणांचा वेळ खर्च होत आहे. 'शासन आपल्या दारी' सारख्या कार्यक्रमांचे ढोल वाजविताना 'दुष्काळ आपल्या दारी' येऊ पोहोचला आहे, याची जाणीव झाल्याचे फक्त भाषणांतून नव्हे; तर कृतीतून दाखविण्याची गरज आहे.

# धर्मशास्त्र व तत्वज्ञानाचे गाढे अभ्यासक -डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन्

राधाकृष्णन हे विसाव्या शतकातील तुलनात्मक धर्म व तत्वज्ञानाचे सर्वात प्रतिष्ठित विद्वानांपैकी एक होते. राधाकृष्णन यांचे तत्त्वज्ञान अद्वैत वेदांतावर आधारित होते. त्यांनी या परंपरेची समकालीन आकलनासाठी पुनर्व्याख्या केली. ज्याला ते अज्ञात पाश्चात्य टीका म्हणायचे, त्याच्यापासून त्यांनी हिंदू धर्माचा बचाव केला. समकालीन हिंदू ओळख निर्माण करण्यात राधाकृष्णन यांनी योगदान दिले. भारत आणि पश्चिम जग अशा दोन्ही देशांमध्ये हिंदू धर्माची समज निर्माण करण्यात त्यांचा मोठा प्रभाव होता. भारत आणि पश्चिम जग यांच्यामध्ये पूल बांधणारी व्यक्ती म्हणून त्यांनी नावलौकिक मिळवला.

१९३१ मध्ये नाइटहूड, १९५४ मध्ये भारतातील सर्वोच्च नागरी पुरस्कार असलेला भारतरत्न आणि १९६३ मध्ये ब्रिटिश रॉयल ऑर्डर ऑफ मेरिटचे मानद सदस्यत्व त्यांना बहाल केले गेले. हेल्पेज इंडिया या भारतातील वृद्ध वंचितांसाठी एक ना-नफा संस्था असलेल्या संस्थापकांपैकी ते एक होते. राधाकृष्णन यांचा असा विश्वास होता की शिक्षक हे देशातील सर्वोत्तम बुद्धिवंत असावेत. १९२१ ते १९३२ या काळात कलकत्ता विद्यापीठातील किंग जॉर्ज पंचम मानसिक आणि नैतिक विज्ञान या विभागाचे अध्यक्ष होते. तसेच ऑक्सफर्ड विद्यापीठातील पूर्व धर्माचे स्पॅल्डिंग चेअर आणि नैतिकता विभागाचे १६३६ ते १९५२ पर्यंत ते अध्यक्ष होते.

चांगल्या शिक्षकांचा सन्मान हा संस्कृतीचा, सत्याचा व ज्ञानाचा सन्मान आहे. समाजाचा विकास सत्तेने होत नाही, यंत्राने होत नाही तर तो आदर्श शिक्षकांमुळे होत असतो. शिक्षकांचे महत्त्व असाधरण आहे हे जाणल्याशिवाय आपली तांत्रिक व यांत्रिक प्रगती होणार नाही. ज्या देशामध्ये शिक्षकाला सर्वत्र मान व प्रतिष्टा असते तेथील प्रज्ञावंत माणसे शिक्षण क्षेत्रातच अधिकाधिक आढळून येतात. असे देश सर्वांगीण प्रगती करू शकतात. समाजाला सुसंस्कृत करणारा शिक्षक हा देशाचा आधार आणि दिलासा आहे. त्यामुळे नागरिकांनी या पवित्र व्यवसायाचा सन्मान केला पाहिजे. एक कुलगुरू हा गुरुकुलाचा आद्य आचार्य असावयास हवा. ज्ञानाने, तापाने, चारित्राने तो सगळ्यांच्या अग्रस्थानी असावा. हे वाक्य कुलगुरू, प्राध्यापक, आणि एक शिक्षक म्हणून डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांना पूर्णतः लागू होते. एक शिक्षक शिष्याला ज्ञान देताना परिपूर्ण असावा असे त्यांचे मत होते. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी अनेक विषयांचा अभ्यास केला होता. संस्कृत भाषेचा अभ्यास करून त्यांनी प्रस्थानत्रयी आणि समग्र भाष्यग्रंथ अभ्यासले. पश्चिमेकडचे तत्त्वज्ञानातील प्लेटो, प्लॉटनिस, कान्ट, ब्रॅडले यांच्यासारख्या तत्त्वज्ञांच्या ग्रंथांचा त्यांनी अभ्यास केला. त्याचप्रमाणे इंग्रजी साहित्यातील शेक्सपिअर, कोलारीज, ब्राउनिंग, वल्ट विटमन इत्यादी साहित्यिकांच्या लेखन शैलीचा त्यांनी अभ्यास केला. तसेच गटे, डानटे, होमर यांसारख्या महाकवींची काव्यसृष्टी अनुभवली. त्यामुळे एक परिपूर्ण शिक्षक म्हणून संपूर्ण जगाने डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा गौरव केला.

धर्म आणि तत्वज्ञान या विषयांप्रमाणेच त्यांचा शिक्षण या विषयावरही उत्तम अभ्यास झालेला होता. स्वतंत्र भारताला शिक्षण विषयक आपले धोरण निश्चित करणे आवश्यक होते. त्यासाठी १९४८ ला भारत सरकारने पहिला शिक्षणआयोग स्थापन केला. त्या आयोगाच्या अध्यक्षपदी डॉ. राधाकृष्णन यांची नियुक्ति झाली. तत्वज्ञान विषयक त्यांचे ग्रंथ जगभर गाजले, भारतीय धर्माचे श्रेष्ठपण दाखवून



देणारेही त्यांचे ग्रंथ आहेत. इंग्लंडला भरलेल्या आंतरराष्ट्रीय तत्वज्ञान परिषदे साठी भारताचे प्रतिनिधी म्हणून त्यांची निवड झाली होती. पुढे अनेक देशात त्यांनी हिंदु धर्माचे गाढे अभ्यास असल्यामुळे हिंदूधर्म तत्वज्ञान प्रभावीपणे मांडले. अस्खलीत इंग्रजीवर प्रभुत्व असल्यामुळे अक्षरश ब्रिटीश सरकारने त्यांच्या मधील सुप्तगुणांचा आदर म्हणुन सर हा बहुमानाचा किताब देवून एका भारतीय विद्वान शिक्षकाचा गौरव केला. तेव्हा पासूनच सर ही उपाधी त्यांना कायम स्वरुपी मिळाली.

प्राध्यापक असल्या पासून त्यांनी शिक्षकाच्या भूमीकेत कोण-कोणते गुण असणे आवश्यक आहे ते स्वत:च्या उदाहरणाने दाखवून दिले. आदर्श शिक्षकाने व्यासंगी बनावे, चांगल्या पध्दतीने आपले विचार दुसऱ्याला सांगावे, शैक्षणिक क्षेत्रातील गुण-दोष पाहून त्यावर कशी मात करता येईल त्यावर लक्ष ठेवावे म्हणजेच आदर्श शिक्षक होता येईल, हाच त्यांनी आदर्श शिक्षक बनण्यासाठी दिलेला संदेश होता. असा तत्वज्ञविद्वान, प्रवक्ता, कुशल प्राध्यापक, लेखक, चिंतक अशा विविध नात्यांनी डॉ. राधाकृष्णन विश्वविख्यात झालेत, म्हणुनच त्यांचा आदर्श ठेवूनच शिक्षकदिन साजरा होत असतो.

डॉ. राधाकृष्णन यांनी खऱ्या गुरुची कल्पना अतिशय सर्वोत्कृष्ट शब्दात मांडली आहे. त्यांच्या मते खरा गुरु तोच की जो विद्यार्थ्यांचा केवळ बौध्दिक नव्हे तर आध्यात्मिक अंध:कारही नाहीसा करील. ज्याचा आचार आदर्शवत व अनुकरणीय आहे तोच आचार्य ! तो विद्यार्थ्यांना सद्गुण व चांगुलपणा यांची प्रेरणा देत असतो. शिक्षक हा केवळ माहिती देत नाही तर आत्म्याची शक्ति तो शिष्यांमध्ये जागृत करतो. शिक्षक आणि शिष्य यांच्यात काही नाते निर्माण झालेले नसेल तर शिक्षणही एक यांत्रिक क्रिया बनते. शिक्षक आपल्या समोर कोणते चारित्र्यपूर्ण आदर्श ठेवतात याचे महत्व मुलांना असते. आदर्श शिक्षकांची सर्व लक्षणे त्यांच्यात होती. शिक्षण क्षेत्रातील अनास्था दूर करण्यासाठी डॉ. राधाकृष्णनच्या जीवन कार्यापासून आपण प्रेरणा घेऊ या !

खऱ्या अर्थाने आईनंतर जर कुणी संस्काराची जबाबदारी पार पाडत असेल तर ते शिक्षकच पार पाडतात. लहानपणी आईचे बोट धरुन चालणारे हात मोठेपणी शिक्षकाच्या तालमीत समाजात उभे राहण्याचे धाडस करतात. परंतू आजच्या घडीला शिक्षक आपली शिक्षणाची जबाबदारी किंवा विद्यार्थ्यांना घडविण्याचे काम खरंच प्रामाणिकपणे पार पाडीत आहेत काय ? हे सुध्दा लक्षात घेतले पाहिजे. प्रत्येक शिक्षकांनी एकांतवास व आत्मचिंतन याचे महत्व समजुन घेतले पाहिजे. कारण आपले हृदय व मन प्रसन्न ठेवण्याची आत्मचिंतन ही गुरुकिल्ली आहे. त्यामुळे प्रसन्नचित्त होवून आकलन शक्ति वाढते व बुध्दि स्थिर होवून स्मरण शक्तीत वाढ होत जाते. हा दिव्यमंत्र शिक्षकांनी आत्मसात करावा, हा हितोपदेश त्यांनी शिक्षकांना आवर्जुन सांगीतला. हिंदूधर्माचा तत्ववेत्ता आणि जगप्रसिध्द तत्वज्ञ म्हणुन भारत सरकारने त्यांना भारत-रत्न हा सर्वोच्च किताब बहाल केला. एका थोर विद्वानाचा तो यथोचित सन्मान होता.

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन म्हणजे खरोखरच आधुनिक जगातले एकश्रेष्ठ दर्जाचे प्रगल्भ विचारवंत आणि तत्वज्ञ होते. त्यांच्या ठायी असलेली अलौकीक ज्ञानसंपदा त्यांच्या नसा-नसांत भिनलेली होती, हे सर्वश्रुतआहे. आपल्या व्यक्तिमत्वाचा अमीट ठसा आदर्श शिक्षक म्हणून शिक्षण क्षेत्रात उमटविला. एकदा डॉ. राधाकृष्णन धीर गंभीर मुद्रेमध्ये असतांना एका पत्रकाराने त्यांना प्रश्न विचारण्याचे धाडस केले सर, आपला जन्मदिवस येतो आहे साजरा करण्याचा मानस आहे. त्यावर लगेच डॉ. राधाकृष्णन म्हणाले, माझा जन्मदिवस साजरा करायची गरज नाही, तो जर साजरा करायचा असेल तर तो शिक्षकदिन म्हणून पाळावा आणि तेव्हापासूनच ५ सप्टेंबर हा दिवस शिक्षकदिन म्हणून डॉ. राधाकृष्णनांच्या नांवे पाळला जात असतो ही वास्तविकता आहे.

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी शैक्षणिक कारकिर्दीमध्ये यश मिळवल्यानंतर त्यांची राजकीय कारकीर्द सुरू झाली. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन हे स्वतंत्र भारताचे पहिले उपराष्ट्रपती होते. १९५२-१९६२ पर्यंत ते उपराष्ट्रपती राहिले. ते स्वतंत्र भारताचे दुसरे राष्ट्रपती (१९६२-१९६७) होते. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन हे स्वतः एक उत्तम शिक्षक असल्यामुळे त्या पेशाबद्दल वाटणारे प्रेम आणि त्यासाठी केलेले ४० वर्षांचे कार्य यांचा सन्मान करण्यासाठी भारत सरकारने ५ सप्टेंबर हा त्यांचा जन्मदिवस शिक्षक दिन म्हणून साजरा करण्याचे जाहीर केले. शिक्षक आणि शिष्य यांचा समन्वय घडवून आणण्याकरीता जे शिक्षक प्रयत्नांची पराकाष्ठा करुन चांगल्या विद्यार्थ्यांवर संस्कार करतात त्यामुळे त्या शिक्षकाचा आदर्श शिक्षक म्हणुन गौरव करण्यात येतो. याच दिवशी शासनाकडूनही देखील आदर्श शिक्षक म्हणुन त्यांनी केलेल्या उत्कृष्ठ कामगीरीचा सन्मान केला जातो. आपल्या गुरुजनांपैकी अनेकांना आदर्श शिक्षक म्हणून सन्मान प्राप्त झालेत, तरी देखील शिक्षक दिन हा शालेय जीवनातला अतिमहत्वाचा दिन म्हणून संबोधण्यात येते. शिक्षक दिनानिमित्त शिक्षकांना मानाचा मुजरा !

– प्रविण बागडे, नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९
ई-मेल : pravinbagdegmail.com

## पदोन्नतीतील आरक्षण बहाल करण्याची कास्ट्राईबची मागणी



**लातूर** (प्रतिनिधी)– महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी अधिकारी कल्याण महासंघ,शाखा पुणेच्या वतीने महाराष्ट्र राज्याचे मा .मुख्य सचिव मनोज सौनिक मंत्रालय, मुंबई. यांची भेट घेऊन राज्यातील कर्मचारी व अधिकारी यांच्या पदोन्नतीतील आरक्षण बहाल करणे व अन्य समस्यांबाबत शिष्टमंडळाने सविस्तर चर्चा करून निवेदन दिले.

मुख्य सचिव यांनी SC, ST,VJNT यांच्या पदोन्नतीतील आरक्षणा बाबत माझी भूमिका सकारात्मक आहे.मी प्रश्न मार्गी लावण्यासाठी अश्वासित आहे असे म्हणाले .या निवेदनात पदोन्नतितील आरक्षण घटनेतील तरतुदी नुसार महाराष्ट्र राज्यामध्ये कर्मचारी अधिकारी यांना बहाल करावे, महाराष्ट्र राज्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची बिंदू नामावलीनुसार तात्काळ अनुशेष भरती करण्यात यावा ,नोकर भरतीचे अधिकार खाजगी कंपनीला देण्यात येऊ नये,सेवानिवृत्त शिक्षकांची भरती न करता सुशिक्षित पात्र बेरोजगार तरूणांना प्राधान्य द्यावे,सातव्या वेतन आयोगाचा महाराष्ट्रातील सर्व शिक्षकांचा २ रा व ३ रा हप्ता तात्काळ देण्यात यावा,जुनी पेंशन संदर्भात नेमलेल्या समितीचा कार्यकाळ संपलेला आहे तरी तात्काळ सकारात्मक निर्णय घेण्यात यावा , सातव्या वेतन आयोगामधील वेतन त्रुटी दूर करण्यात याव्यात आदी विषयांवर सविस्तर चर्चा करून संबंधित मागण्यांचे निवेदन मुख्य सचिव यांच्याकडे देण्यात आले . सदरील निवेदनावर राज्याध्यक्ष चंद्रकांत जाधव महासचिव प्रवीण खाडे, लातूर, विभागीय अध्यक्ष जी. टी. होसुरकर, लातूर, जिल्हा अध्यक्ष नागसेन कांबळे, ज्येष्ठ मार्गदर्शक दिलीप जाधव व जिल्हा सचिव किशोर गायकवाड, आरक्षण समितीचे अध्यक्ष रवी कुरील, समिती सदस्य डि. के. सुर्यवंशी, भोसले, ढगे, गायकवाड , आर पी हिंगे, प्रवीण सूर्यवंशी, डॉ. विलास गाजरे, काळे, शांतीलाल लांडगे, माधव कांबळे, रणजीत लांडगे, रमेश मांदळे, रणदिवे इ. उपस्थित होते.

पान १ वरून....

### मराठा आरक्षणाबाबत...

बिघडली तेव्हा त्यांना रूग्णालयात भरती करण्यास पोलीस गेले होते, असे शिंदे यांनी सांगितले. आंदोलनाच्या आडून या महाराष्ट्रात शांतता बिघडवण्याच काम किंवा जाती जातीत तणाव निर्माण करण्याच काम करत आहेत, त्यांच्यापासून सावध राहिले पाहिजे, असे ते म्हणाले.

जो प्रकार झाला त्याची आम्हाला खंत आहे. शासन गंभीर आहे आणि समाजाला आरक्षण मिळावे यासाठी काम करतोय. जे आज त्या ठिकाणी आरक्षण मिळालं पाहिजे अस बोलत आहेत. तुम्ही त्या पदावर होतात तेव्हा तुमचे हात कोणी बांधले होते, असे म्हणत शिंदेंनी ठाकरेंवर निशाणा साधला.सरकार बदलल्या नंतर महाविकास आघाडीचे सरकार आले. त्यांच्या काळातच सर्वोच्च न्यायालयाकडून आरक्षण रद्द झालं, असं ते म्हणाले.

त्रुटी दुर कशा होतील यावर सरकार काम करत आहे. कोर्टाच्या निर्दशनास ज्या काही बाबी आणायच्या आहेत त्यावर सुद्धा काम सुरू आहे. राज्याचा प्रमुख म्हणून इच्छाशक्ती लागते. सरकार येताच अनेक योजना आणि निर्णय घेतले, अशी माहिती शिंदेंनी दिली. आरक्षण मिळाले पाहिजे आणि ते टिकले पाहिजे. आम्हाला कोणाला फसवायचे नाही. आमची भूमिका देवेंद्र जी मुख्यमंत्री होते तेव्हाही होती आणि आजही आहे. त्याच्यावर काम आता सुरु आहे. आयोगाला सुचना केल्या आहेत. ज्या त्रुटी सुप्रीम कोर्टाने काढल्या आहेत त्यावर काम सुरु आहे. सरकार मागे पडणार नाही. मराठा समाजाला माजी विनंती आहे की त्यांनी संयम बाळगावे. सरकार पूर्णपणे प्रमाणिक पणे आरक्षण देण्याच्या बाजूने आहे, अशी ग्वाही त्यांनी दिली.

### जिल्ह्यात टंचाईची परिस्थिती निर्माण...

संयुक्तपणे करण्यात आले आहेत. सरसकट सर्व पीक विमाधारक शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची २५ टक्के आगाऊ रक्कम देण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न करणार असल्याचे ना. बनसोडे यांनी यावेळी सांगितले. जिल्ह्यात ग्रामीण भागामध्ये जलजीवन मिशन योजनेच्या ८७९ योजना मंजूर असून त्यासाठी ६२८.६२ कोटी रुपये निधी उपलब्ध आहे. सद्यस्थितीत ५६ ठिकाणे सोडली तर उर्वरित ठिकाणी कामे सुरु आहेत. ज्या ५६ ठिकाणी कामे सुरु नाहीत, त्या कंत्राटदारांकडून तत्काळ कामे काढून घ्यावीत आणि त्यांना नियमाप्रमाणे काळ्या यादीत टाकण्याची कार्यवाही करावी, अशा सूचना ना. बनसोडे यांनी दिल्या. जिल्ह्यातील सर्व धरणांमध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साचला आहे. तो गाळ काढण्यासाठी मोहीम हाती घ्यावी. जेणेकरून भविष्यात टंचाईची परिस्थिती निर्माण झाली, तर हा वाढीव पाणीसाठा वापरायला मिळेल, असे खासदार श्री. शृंगारे यांनी सांगितले. पाण्याच्या स्थितीबाबत जलसंपदा विभागाने लोकप्रतिनिधींना अवगत करावे. तसेच अनधिकृत पाणी उपशावर तत्काळ नियमानुसार कार्यवाही करावी, अशा सूचना आमदार श्री. पाटील निलंगेकर यांनी दिल्या.

टंचाईची परिस्थिती निर्माण झाल्यास पिण्याच्या पाण्यासाठी जलस्त्रोतांचे अधिग्रहण करण्याचे अधिकारी उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांच्यापर्यंत वर्ग करावेत. त्यामुळे लोकांची पिण्याच्या पाण्यासाठी पायपीट होणार नाही, असे आमदार श्री. पवार यांनी सांगितले.

### भारतीय बौद्ध महासभा नवी मुंबई ....

जिल्हा अंतर्गत शाखा, माजी जिल्हाध्यक्ष, वरिष्ठ केंद्रीय शिक्षक, वरिष्ठ केंद्रीय शिक्षिका, शालेय शिक्षक, बौद्धाचार्य, सैनिक, दहावी व बारावी मधील ८५% टक्के मिळून पास झालेले विद्यार्थी, उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी, अशा सर्वांचा साहेबांच्या हस्ते सन्मान चिन्ह, सन्मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. नवी मुंबई जिल्ह्याचा २५ वर्षा नंतर प्रथमच होणाऱ्या या वर्धापन दिन सोहळ्याचे साक्षीदार म्हणून नवी मुंबई जिल्हा अंतर्गत शाखेतील सर्व पदाधिकारी, केंद्रीय शिक्षक, केंद्रीय शिक्षिका, बौद्धाचार्य, माजी श्रामनेर, उपासक, उपासिका, बाल, बालिका, सैनिक यांनी फार मोठ्या प्रमाणात उपस्थिती लावली होती. विजय कांबळे (कोषाध्यक्ष महाराष्ट्र राज्य), यु. जी. बोराडे (उपाध्यक्ष संस्कार विभाग महाराष्ट्र राज्य), सुनील बनसोडे (उपाध्यक्ष पर्यटन विभाग मुंबई प्रदेश), महादेव गायकवाड (संघटक मुंबई प्रदेश), सुरज चव्हाण (संघटक मुंबई प्रदेश), डी. टी. सोनावणे (माजी कोषाध्यक्ष केंद्र), अलकाताई आढाव (माजी महिला सचिव महाराष्ट्र राज्य) व इतर पदाधिकाऱ्यांनी देखील उपस्थिती लावून नवी मुंबई जिल्ह्याचा आनंद द्विगुणित केला. आपला अमूल्य वेळ देऊन कार्यक्रम संपन्न करण्यास सहकार्य केल्याबद्दल आपणा सर्वांचे नवी मुंबई जिल्हा शाखेच्या वतीने नवी मुंबई जिल्हाध्यक्ष जयवंत लव्हांडे यांनी शतशः आभार व्यक्त केले.

# लढले हक्कासाठी तर मिळेल लाठी...

भारताचा इतिहास हा लोभी स्वार्थी व नितीहीन लोकांचे वर्चस्व कायम रहावे म्हणून माणसा माणसा भेद करून विषमता व जातीवाद वाढवून, त्यांना कोणतेही हक्क अधिकार न देता केवळ अंधविश्वास व धर्माच्या नावाखाली गुलाम बनवून पाखंडाच्या माध्यमातून अनेक धुर्त लोकांनी भारतीय लोकांचे आर्थिक, मानसिक शोषण करून आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. स्वतःला च श्रेष्ठ समजून इतरांना कनिष्ठ समजणाऱ्यांची किती घान माणसिकता असेल हे लक्षात येते. इतरांना दुय्यम समजणारी माणसिकता नैतिक दृष्टीने व न्यायीक दृष्टीने कधीच न्यायीक नसते. अन्याय अत्याचार, दिशाभूल करून, अज्ञान, अंधविश्वास यांच्या माध्यमातून लोकांना कमकुवत करण्यात ज्यांना सामर्थ्य वाटते तेच खरे भ्याड लोक असतात. आणि बहुसंख्य ताकदवान लोक धर्म, अंधविश्वास व पाखंड यांच्या यामुळे माणसिक गुलाम झाले म्हणून भ्याड लोक आजही गुलामांचे सरदार आहेत हिच बाब लोकांना कळत नाही. ज्यांना हि बाब कळाली, म्हणुन जे लोक अंधविश्वास, पाखंड, विषमता, भोंदुगीरी नितीहीन लोकांचे वर्चस्व लाथाडून समता बंधुता न्याय व स्वातंत्र्यावर बोलताना त्या लोकांना पुरोगामी म्हणून हिनवले जाते. आणि हेच हिनवणे हिणवणारा किती माणसिक गुलाम असून तो विषमता वादी पिळावळीची किती लाचारी करतो हे सिद्ध होते. शिक्षण नाही, नोकरी नाही, विकासाच्या व समतेच्या संधी नाहीत, केवळ भोंदु आणि पाखंडी लोकांनी सांगितले तेच अंतिम सत्य माणुन जगायाचे अशा खितपत पडलेल्या माणवाच्या जिवनाला फुलें शाहु आंबेडकर यांनी सोन्याचे रुप दिले परंतु आजही विषमता, भोंदुगीरी पांखड, फसवेगिरी, अंधविश्वास च्या माध्यमातून मिळालेली गुलामीच चांगली वाटते पण शिक्षण, आरक्षण, समान संधी समता, बंधुतेच्या माध्यमातून दिलेले माणसिक व शारिरीक स्वातंत्र्य आणि हक्क अधिकार देणारे महापुरुष पचत नाहीत याचे कारणच आहे ते म्हणजे माणसिक गुलामी. जोपर्यंत व्यक्तीला फुले शाहु आंबेडकर आंदोलन कळणार नाही तो पर्यंत प्रत्येक जण गुलाम म्हणुनच जिवन जगेल. ज्यांना फुले शाहु आंबेडकर आंदोलन कळाले ते लोक स्वाभिमानी व समतावादी बनुन अन्याय अत्याचारा विरोधात ठाम पणे उभे राहून आदर्श राष्ट्राची संकल्पना मांडतात. ज्यांना फुले शाहु आंबेडकर आंदोलन कळाले नाही ते मात्र विषमता, अंधविश्वास, पाखंड भोंदुगीरी, धर्माच्या माध्यमातून आजही गुलामच आहेत. आणि गुलाम मालका सोबत प्रामाणिक असतात म्हणून ते कधीच बंड वा आंदोलन करत नसतात. तर मालकाने सांगितलेले काम चोक करत असतात. प्रत्येक वेळी हि पार्श्वभूमी सांगणे अत्यंत आवश्यक आहे. कारण पार्श्वभूमीच कळाली नाही तर सद्य परिस्थिती कळणार नाही. हजारो वर्षापासून अज्ञान, हक्क, अधिकार, शिक्षण व विकासासाच्या संधी का नाकारल्या गेल्या याचे उत्तर शोधले आणि समजून घेतले तर धुर्त लोकांचे वर्चस्व कायम रहावे म्हणून लोकांना ह्या गोष्टी नाकारण्यात आल्या. फुले शाहु आंबेडकर चळवळीचे संरक्षीत व प्रभावी स्वरूप म्हणजे भारतीय राज्यघटना. हजारो वर्षांपासूनची गुलामी, अज्ञान, विषमता, एकाच झटक्यात नेस्तनाबूत करून स्वातंत्र्य, शिक्षण, समता, हक्क अधिकार व सर्वांना समान संधी निर्माण करून हजारो वर्षांपासून चालत आलेल्या धुर्त लोकांच्या हीताची विषमता वादी शोषणवादी व्यवस्था उलथून पाडली. हिच बाब आजही जिवंत असलेल्या धुर्त व नितीहीन लोकांना खटकत आहेत. आजही त्यांना भारतीय संविधान व संविधानाच्या माध्यमातून लोकांचा झालेला सर्वांगीण विकास व स्वाभिमान आणि हक्क अधिकाराप्रती जागृत झालेले लोक सहन होत नाहीत. याचे अनेक उदाहरणे आहेत. परंतु अनेक जन आजही गुलामीचा चष्मा उतरवायला तयार नाहीत. म्हणून आजही धुर्त लोक त्यांचा अजेंडा पुर्ण करताना दिसुन येतात. स्वार्थी आणि पाखंडी लोकांना आपणलेच वर्चस्व कायम असावे व इतरांनी गुलामी करावी एवढेच वाटते म्हणून गुलामांना मालका प्रमाणे राहता येत नाही गुलाम आणि मालक यांच्या मध्ये फरक असतो. आणि हाच फरक दुर करून संविधानाचे सर्वांनाच मालक केले हिच बाब दुर्तांना सहन होत नाही म्हणून त्यांच्या कुरापती सुरू असतात. सत्य बोलणारा, लोकांना जागृत करणारा, हक्क अधिकार मागणारा यांच्या वर कारवाई केली जाते लाठीचार्ज केला जातो. केंद्रात व राज्यात हिंदुत्ववादी सरकार आहे. धर्माच्या नावाचा वापर मत मागताना किंवा राजकारण करताना करता येत नाही असे सर्वोच्च न्यायालयचे जजमेंट असताना ही धर्माच्या नावाचा वापर केला जातो. जे लोक सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन करत नाहीत ते लोक सर्वसामान्य लोकांचे भले करतील हे बैलासमोर दुधाची बाटली घेऊन दुध देण्याची अपेक्षा करण्या सारखेच आहे. हिंदुचे सरकार हिंदुच्या हिताचे काम करण्यासाठी तयार केले केले. परंतु हिंदू कोणाला म्हणायचे हे अजूनही कोणालाच कळाले नाही. आणि एक सरळ सरळ नियम असतो. राजा आपल्याच प्रजेवर कधीच अन्याय अत्याचार करत नसतो. सांगण्याचा उद्देश हा आहे की हिंदुत्वाच्या नावाखाली सरकार तयार झाले आणि वारकऱ्यांवर लाठीचार्ज केला. जे वारकरी समता बंधुता नांदावी भेदभाव नष्ट होऊन संताच्या विचारावर आधारित व्यवस्था निर्माण व्हावी त्या वारकऱ्यांवर लाठीचार्ज केला जातो आणि सरकार प्रकरण दाबुन टाकते. याचाच अर्थ वारकरी हिंदु नाहीत. कारण सरकार हिंदुचे आहे आणि हिंदू च हिंदुवर लाठीचार्ज करूच शकणार नाही. दुसरी महत्त्वाची गोष्ट जी जालना येथे घडली संविधानीक मार्गाने हक्क अधिकार माघण्यासाठी मराठा समाज रस्त्यावर उतरला त्यांच्या मागण्या मान्य न करता त्यांच्या वर लाठीचार्ज करून सरकारने हे दाखवून दिले की सरकार ज्या हिंदुसाठी बनले त्यामध्ये मराठा समाज येतच नाही. जर मराठा समाज हिंदु असता तर हिंदुच्या सरकारने हिंदुवर लाठीचार्ज का केला असता. बर दुसरी बाब बघा जनतेला किती मुर्ख बनवले जाते. ज्यावेळी आताचे गृहमंत्री विरोधी पक्षात होते तेंव्हा ते सांगत होते आमचे सरकार आले तर आम्ही मराठा आरक्षण देऊ. जे कॅमेऱ्या समोर सांगायचे मराठा आरक्षण देता येते पण आम्ही सत्ते मध्ये पाहिजे. आता ते सत्तेमध्ये आहेत आणि मराठा आरक्षणाची मागणी होत असताना आंदोलकांवर लाठीचार्ज करून आंदोलन दडपून टाकले जाते. याचा अर्थ सरकार हे मराठा समाजाच्या हिताचे नाही. हिंदु व हिंदुत्वाशी अनेक लोक भावनिक आहेत. हिंदु धर्माच्या चुकिच्या बाबींवर कोणी सत्य बोलले तर धर्म धोक्यात येतो म्हणणारे, हिंदु धर्मासाठी काही ही करतो म्हणणारे, हिंदू बद्दल एकही शब्द ऐकुन घेणार नाही अशी धमकी देणारे, स्वतः ला हिंदुत्ववादी संघटनेचे कार्यकर्ते पदाधिकारी समजणारे लोक वारकरी व मराठा बांधवांवर लाठीचार्ज होतो तेव्हा एकही शब्द बोलत नाहीत. तेव्हा समजून घ्यायला पाहिजे कि सत्तेतील हिंदु हे वेगळ्या लोकांसाठी आहे आणि सर्वसामान्य लोकांचे हिंदुत्व फक्त समाजात दुफळी निर्माण करून मताची झोळी भरण्यासाठी आहे. वारकरी लाठीचार्ज, मराठा आंदोलकांवर लाठीचार्ज या वेळी कोणत्याही हिंदु आमदार खासदार यांच्या भावना दुखल्या नाहीत कोणी ही आमच्या लोकांवर लाठीचार्ज झाला म्हणून राजीनामा दिला नाही. हि गोष्ट समजून घेणे महत्त्वाचे आहे. जोपर्यंत हि बाब कळणार नाही तोपर्यंत व्यवस्था कळणार नाही. मार खाणारे आणि मारणारे यांचा धर्म कधीच एक नसतो. देणारे आणि माघणारे यांचा धर्म कधीच एक नसतो. आणि सर्वात महत्वाचे म्हणजे राजा माघत नसतो तर देत असतो. काही भक्त लोकांना वाटत असेल की आमच्या जातीचे लोक आमदार खासदार आहेत म्हणून आम्हाला काही मिळेल. आमदार खासदार असणे म्हणजे सत्ता मुळीच नाही. आपल्या लोकांना काही देण्याचा अधिकार म्हणजे सत्ता असते. मराठा समाज आरक्षण माघत आहे म्हणजेच देणारे मराठा लोक नाहीत. जर मराठा लोकांना देण्याचे अधिकार असते तर आमदार खासदार भरपूर आहेत तरीही ते देऊ शकत नाहीत. याचाच अर्थ मराठा समाज हा सत्तेमध्ये नाही. हक्क माणणाऱ्याला लाठीचा मार दिला जातो व मनोहर कुलकर्णी देशाचा ध्वज, राष्ट्रगीत नाकारून महात्मा फुलेंबद्दल वादग्रस्त विधान करून गांधी यांच्या वडीलांबद्दल संशय घेऊन इतिहासाचे विद्रुपीकरण करतो तर त्याला पोलीस संरक्षण दिले जाते. कुरूलकर देशाची गुप्त माहिती पाकिस्तान या शत्रु राष्ट्राला देतो तरीही त्यांच्या वर राष्ट्रद्रोहाचा खटला भरला जात नाही. संविधानीक मार्गाने शासकीय शिक्षण व नोकरी मध्ये आरक्षण मागीतले तर मार मिळतो. जर मराठा समाजाने हिंदुच्या मंदिरात पुजाऱ्या साठी आरक्षण मागितले तर काय होईल याचा विचार करा. आणि मंदिरात आरक्षण मागितले तर खरे कळेल नेमके हिंदुत्व व हिंदु यांचा वापर कोणासाठी होत आहे. अंधविश्वास पसरवणाऱ्या भोंदुच्या कार्यक्रमाला लाखो लोक आले तर लाठीचार्ज होत नाही, देशद्रोह्यावर होत नाही. पण हक्क अधिकार मागून विकासाची संधी मागीतली तर मात्र मार बसणारच. येथे मराठा समाजाचेच नाही तर माणसाचे हक्क अधिकार धोक्यात आहेत. माणसाला व माणसाच्या हिताच्या लोकशाही ला वाचवायचे असेल तर जाती धर्माचा विचार न करता केवळ मानवहीता साठी सर्वांनी एकत्र येऊन ईव्हीएम ला विरोध करून बॅलटपेपर वर निवडणुक घेण्याची मागणी यशस्वी करावी. तरच लोकशाही व लोकांचे हक्क अधिकार वाचतील व कोणावरही अन्याय अत्याचार होणार नाहीत व समता बंधुता न्याय आधारित समाज व्यवस्था कायम राहील.

**– विनोद पंजाबराव सदावर्ते**
समाज एकता अभियान रा. आरेगांव
ता. मेहकर मोबा: ९१३०९७९३००

***

# ओबीसीनो लोकशाही समजली काय ?

ओबीसी सुतार सामाजिक क्षेत्रात आजपर्यंत समाज जागृती निर्माण करण्यासाठी कोणीही प्रयत्न केले नाहीत कारण समाज जागृती मुळे स्वतःला ओबीसी सुतार समाजात प्रतिष्ठित समजणारे,समाज नेते समजणारे स्वयंघोषित समाज नेत्यांच्या खऱ्या खोटच्या अस्तित्वालाच धक्का बसण्याची भिती समाजात निर्माण होत असते त्यामुळे समाज जागृती करणाऱ्या सर्वसामान्य सुतार समाज बांधवांना दबावाखाली घेणे,मुस्कटदाबी करणे, धमकीचा प्रकार घडणे इत्यादी अवैचारिक आणि असंवैधानिक पद्धतीचा वापर केला जाऊ शकतो जेणेकरून ओबीसी सुतार समाजात कोणीही समाज जागृती निर्माण करण्यासाठी प्रयत्न करु नये हि संकुचित मानसिकता बदलणे गरजेचे आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान निर्माण करतांनाच संविधानात अभिव्यक्ती स्वातंत्र्य अधोरेखित केले आहे. त्यासाठी संविधान निट समजणे गरजेचे राहील.

देशात ओबीसी समाजाची लोकसंख्या ५२ टक्के आहे.हे आकडे वारी खूप जुनी आहे. ओबीसी म्हणजे कोण हेच किती तरी ओबीसी मधील जातीच्या उच्चशिक्षित लोकांना माहिती नाही.हे त्याच्या घरात गेल्यावर शंभर टक्के समजते.अन्यता ज्यांच्या हजार पिढीचा कोणता ही संबध नसलेल्या श्रद्धा,अंधश्रध अज्ञान घरात दिसले नसते.त्या जागी भारतीय संविधान असते.इतर मागास वर्ग किंवा ओबीसी हा सामाजिकदृष्ट्या व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला प्रवर्ग (समाज) आहे. भारतात बहुसंख्य समाज हा मागासलेलाअसून पुढारलेला समाज म्हणजे ब्राम्हण,क्षत्रिय,वैश्य हा अल्पसंख्य आहे. या बहुसंख्य मागास समाजापैकी जो जास्त मागास आहे तो 'मुख्य मागास' समजला जातो. त्याला अनुसूचित जाती जमाती (एस सी,एस टी) म्हटले जाते. या मुख्य मागासांपेक्षा कमी मागासलेल्या समाजघटकांना 'इतर मागास' ठरविण्यात आलेले आहे. भारतातील ४१% ते ५२% लोकसंख्या ओबीसीची आहे.मंडल आयोगाने महाराष्ट्रातील ओबीसी जातींची संख्या ३६०, तर देशात ओबीसी जातींची संख्या ३,७४४ इतकी नोंद केलेली आहे. इतर मागासवर्गीयांसाठी असलेल्या राष्ट्रीय आयोगाने २,१७१ प्रमुख ओबीसींची यादी जाहीर केलेली



आहे. ह्यांतील उपजाती जमेस धरल्यास ही संख्या आणखीही वाढू शकते. कुणबी, साली, माळी, कोष्टी, तेली, भावसार, वाणी, शिंपी, नाभिक, पारीट, गुरव, गवळी, जंगम, पांचाळ, फुलली, रंगारी, सुतार, कासार, धनगर, भंडारी, तांडेल, तांबट, मोमीन, घडसी, विणकर, आगरी, कुंभार, सोनार, कोळी, लोहार, बंजारा अशा अनेक लक्षवेधी जाती ओबीसी मध्ये मोडतात.या प्रवर्गास केंद्रात २७ टक्के तर महाराष्ट्र राज्यात १९ टक्के आरक्षण भारतीय संविधांनाने म्हणजेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिले होते.पण ओबीसी गर्वसे कहो हम हिंदू है!. म्हणायला लागला आणि त्याचे आजच्या घडीला अनेक ठिकाणचे आरक्षण पद्धतशीर पणे काढण्यास गेले तरी तो जागा होत नाही.म्हणूनच मी सुतार ओबीसी जाहीरपणे विचारतो.ओबीसीनो लोकशाही समजली काय?.


डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय जनतेला आपले संविधान निर्माण करून संवैधानिक अधिकार बहाल केले आहेत आणी अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार प्रत्येक भारतीय नागरिकाला मिळाला आहे.भारतीय संविधान सर्वोच्च संविधान सर्वं सामान्य माणसाच्या भावना व्यक्त करणे, मत व्यक्त करणे, अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा आवाज न दाबणे, अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी करण्याचा प्रयत्न न करणे, सर्व सामान्य माणसाच्या मनातील भावना मनातील विचार समाजहित दर्शक विचारांचा प्रचार प्रसार करण्यासाठी प्रयत्न करणे, प्रोत्साहन देणे जनहितार्थ, समाजहितीर्थ, विकासात्मक बाबींचा विचार करता प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी प्रयत्न करण्यासाठी पाठबळ देणे,प्रोत्साहन देणे.जिथं जनहित जिथं समाजहित असेल,त्या त्या वेळी सहकार्य करणे, जनहितार्थ, समाजहितीर्थ प्रत्येक गोष्ट,प्रत्येक विषय, प्रत्येक प्रश्नांची उकल करणे, त्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी प्रयत्न करणे,प्रोत्साहन देणे.हे ओबीसी ना भारतीय संविधानाने दिले,पण ते समजून घेण्यासाठी ते संविधान वाचवे लागेल.पण आम्हाला सांगितले कि ते आंबेडकरांनी त्यांच्या जातीसाठी लिहले. म्हणूनच आमच्या बहुसंख्य ओबीसीनी ते वाचले नाही.मी खोटे लिहत असेल तर प्रत्येक ओबीसीनी आपल्या छातीवर हात ठेऊन प्रामाणिकपणे सांगावे.हो मी संविधान वाचले आणि मला लोकशाही समजली.

भारतीय संस्कृतीत जनता महत्वाची नाही आहे,वर्ण महत्वाचा आहे.ओबीसी कुठल्या वर्णात येतात?. भारताच्या इतिहासात,भारतीय संविधान हेच सर्वोच्च आहे.म्हणूनच विचारतो ओबीसीनो लोकशाही समजली काय?.संविधान ज्याला समजले त्याला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार समजला. ज्याला संविधान समजले ती व्यक्ती तत्व मुद्दे मुळ विषय या मुख्य बाबींचा विचार करतो. कधीही विषयाला बगल देणार नाही.ज्याला संविधान समजले ती व्यक्ती कोणाच्याही अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणण्याचा प्रयत्न करणार नाही. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करणार नाही. अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी मुस्कटदाबी करण्याचा प्रयत्न करणार नाही.ज्यांना संविधान समजले ती व्यक्ती प्रत्येक मताचा सन्मान करणार यात शंकाच नाही.आवाज दाबण्याचा प्रयत्न आणि कोणाचीही मुस्कटदाबी करणार नाही गळचेपी करणार नाही.हे जर सत्य आहे तर राम मंदिराच्या आंदोलनात सर्वात जास्त ओबीसी होते.आणि बळी सुद्धा ओबीसीचाच गेला.पण त्याला ट्रस्टी मध्ये प्रतिनिधित्व का नाही मिळाले.तिथे लोकशाही का नाही लागू झाली.यावर किती ओबीसी विचारवंतानी, साहित्यिकांनी, पत्रकारांनी, संपादकांनी प्राध्यापक शिक्षकांना लिहले.का नाही लिहले?.म्हणजेच ओबीसीनो लोकशाही समजली काय?.मी एक सामन्य ओबीसी सुतार समाजाचा भंगारचा धंदा करतो.मला अनेकांचे लेख, पुस्तके वाचून हे प्रश्न पडतात.त्यावेळी मी आपल्या मोडक्या तोडक्या शब्दात लिहून हे विचारण्याचे धाडस करतो.मग उच्चशिक्षण घेतलेलं ओबीसी प्राध्यापक शिक्षक का नाही लिहू शकत.हा माझा जाहीर प्रश्न सर्वच उच्चशिक्षण घेणाऱ्या सुशिक्षित ओबीसींना आहे. म्हणजेच ओबीसीनो लोकशाही समजली काय?.

ओबीसी समाजात एक मोठा वर्ग शिक्षकाचा आहे.आणि शिक्षक म्हणजे ज्ञानाचे भांडार. शिक्षकांचे समाजासाठी देशासाठी महत्व व योगदान खूप मोठे असते.तेच देशासाठी सुजान नागरिक घडवितात.जसे ते शाळांमध्ये विध्यार्थी घडवितात तसेच काम ते शाळेबाहेर समाजात करू शकतात. ओबीसी समाजाचे शिक्षक कोणत्या विचारधारेच्या संघटना मध्ये सभासद बनून मतदार बनतात.कोणत्या विचारधारेच्या संस्था संघटना मोठ्या करतात?. भारतीय संविधान मानणाऱ्या की मनुवादी विचारांच्या सरस्वतीला विद्येची देवी मानणाऱ्या संघटनांना प्राधान्य देतात.म्हणूनच ओबीसी शिक्षकानो लोकशाही समजली काय?.असे जाहीरपणे विचारतो.

देशातील ओबीसी शिक्षक,प्राध्यापक विविध क्षेत्रातील कर्तबगारी बजावण्यात यशस्वी होण्यासाठी ज्या हजारो विद्यार्थ्यांना योग्य प्रकारे मार्गदर्शन करतात. ते शिक्षकच देशासाठी राजकीय क्षेत्रात, सामाजिक क्षेत्रात,उद्योग क्षेत्रात, वैद्यकीय, शैक्षणिक, विज्ञान, सुरक्षा यंत्रणा, तंत्रज्ञान विकसित करणे अशा विविध प्रकारची पिढी घडविण्यासाठी प्रयत्न करतात ते शिक्षकच सामाजिक, वैचारिक, नैतिकता, प्रामाणिकता सत्याची कास धरून वाटचाल करणारे नसतील तर? ओबीसी बहुसंख्य असून ही वैचारिक मानसिक गुलामच निर्माण होती. अशांना देशाचे राष्ट्रपती बनविले तरी ते मंदिरात जाऊन दर्शन घेण्याची हिंमत दाखवणार नाहीत.पायरीवर बसून दगडाच्या पायाच पडतील.कारण मनुवादी समाज व्यवस्थेत वर्ण व्यवस्थेनुसार त्यांना तो अधिकार नाही.भारतीय संविधानाने तो त्यांना फुकट दिला म्हणून त्याची त्याला किंमत नाही.एक राष्ट्रपती गुलाम बनून राहिला आता त्याजागी दुसरा आदीवासी विशेष महिलेची निवड झाली तिने ही वर्णव्यवस्थे नुसार मंदिरात झाडून मारून आपली लायकी दाखवून दिली. इत्यादी अनेक गोष्टी लक्षात घेता त्याचे धडे देणारे हे शिक्षकच आहेत.ते कोणते शिक्षण देतात हे महत्वाचे आहे.शिक्षक म्हणजे शिक्षकच ते विज्ञान शिकवतात कि अंधश्रद्धा वाढवणारे अज्ञान हे परिस्थिती नुसार अवलंबून असत. विद्यामंदिरात विविध प्रकारचे विकासात्मक पैलु असणारे शिक्षकच देशाच्या,समाजाच्या उन्नतीसाठी विध्यार्थी घडवतात.ते विध्यार्थी पुढे सुजान नागरिक, मतदार आणि जाती जातीचे पदाधिकारी,लोक प्रतिनिधी बनतात.तेव्हा संख्येची गणिते समोर येतात.अल्पसंख्याक कि बहुसंख्याक ओबीसी मगच जाहीरपणे विचारावे लागते ओबीसीनो लोकशाही समजली काय?.

जय जिजाऊ,जय शिवराय,जय संविधान,जय ओबीसी,जयभिम.



– प्रमोद सुर्यवंशी,
मो. ८६०५५६९५२१,
चिखली,मातृतीर्थ बुलडाणा

# कलम ३५३ कायदा हटविण्याच्या वैद्य शिफारसला मान्यता द्यावी

विशेष अत्यंत महत्वाची माहिती व कायदेशिर मुद्दा लक्षात आणून देण्याचा प्रयत्न् केला जात आहे. एखादा सर्व सामान्य् नागरिक व कामगार कर्मचारी यांच्या तर्फे कोणत्याही कार्यलयात काही मूलभूत मागणी समस्या व तक्रार आणि इतर सोयी सुविधा किंवा सरकारी योजना मिळण्यासाठी अर्ज व निवेदन देऊनही योग्य् कार्यवाहीसउशीर विलंब लावून तोंडी व लेखी उतर देण्यास (काही अपवाद वगळून) अधिकारी व वरिष्ठ् कर्मचारी यांच्या तर्फे वारंवार टाळाटाळ करुन माघणीकरणाऱ्यांना पुन्हा पुन्हा चुकीचे सांगून खोटे बोलूनअधिकारी वरीष्ठ् कर्मचारी यांच्या मार्फत अगर नियमानुसार व जबाबदारीने प्रलंबित मागणी आणि तक्रारी समस्यांची काहीच हरकत घेतली जात नसेल आणि दर रोज कार्यालयात संबंधित व्यक्ती थांबत नसेलवविनापरवानगीने नेहमी अनुउपस्थित राहत असेल तथापी या संदर्भ कारणावरून दुसऱ्याचे एकूण जाणीवपुर्वक दुर्लक्ष करून इतर ठिकाणी बसून कार्यलयीन कामकाज पहात असेनतेव्हा मात्र सर्व साधारण नागरिक किंवा कर्मचारी व इतर यांच्या कडून सामूहिक व व्यक्तीगत स्व्त:आपल्या कामाचा पाठपुरावा पुर्ण होण्याकरिता कोणताही वरिष्ठ् अधिकारी कर्मचारी असो त्यांना सार्वजनिक व वैयक्तिक सरकारी खाजगी ठिकाणी तथा घरी किंवा रस्त्यावर( ऐण वेळी काही तरी बहाना सांगून सुट्टी काढून कोणत्याही गावी निघून गेल्यास) काही तरी वेळ मर्यादा संपल्यानंतर खरे खोटे जाणून घेण्यास तक्रारदार यांनासुद्धा त्या गावी जाऊनप्रत्यक्षातभेटायला व चर्चा करायला अधिकृत योग्य् परवानगी अधिकार मानला जातो. परंतु; बेजबाबदार अधिकारी व कर्मचारी यांच्याकडे नागरिक व कर्मचारी कामगार किंवा व्यापारी यांनी गेल्यावर नियमाप्रमाणे जाब विचारल्याने अधिकाऱ्यांनी रागात येऊन फिर्यादाराला शिवीगाळ केली किंवातेथेच दोघात मारहान मारामारी झाली तर फक्त् अधिकारीयांच्यावर दोषी कारण लागू होऊन कायद्याने अधिकाऱ्याच्या हलगर्जीपणा बेपर्वाईव मनमानी कारभारामुळे अधिकारी व वरिष्ठ् कर्मचारी यांच्यावरील पोलीस कार्यावाही करणे वैद्द मानले जाते; यासाठी ह्या प्रकाणात अर्जदार जिम्मेदार व दोषी राहिला जात नसून कार्यलयातील दाखल अर्ज निवेदनवरील खरी माहितीव पुरावाहाच निर्दोष असण्याचाखरा अधारसर्व मान्य् ठरला जात आहे.

कारण वरीष्ठ् कर्मचारी अधिकारी यांना कलम ३५३ मध्ये कायद्यात बचाव सूट संधी देऊन जबाबदारी टाळायला सोयीचा कायदा करून ठेवला गेल्याने जनता नागरिकांना व इतरांना केवळकायद्याचा विनाकारण दबावधाकदाखवून व सर्वांच्यासरकारी कामकाजात गैरसोय अडथळा व भेदभाव निर्माण केलेलाअसल्यामुळे सर्व समाज बांधवांना आपला प्रगती विकास करण्याचे आज पर्यंत सर्व सामाजिक, आर्थिक, समान न्याय,हक्क्, अधिकार नाकारले जात आहेत. त्यासाठी कलम ३५३ लागू असलेला हाअन्यायकारक एकेरी कायदा हटवूनरद्दकरण्याच्या शिफारस वरून निर्णय घेऊन मागील काळात घडलेल्या राज्यातील शासकीय अशासकीय मागसवर्गीय नागरिक कामगार कर्मचा-यावर दाखल केल्या गेलेले खोटे फौजदारी खटले वापस परत घेण्यास खरा नैतिक कायदा राबवून खोटे आरोप व केसेस मागे घेण्यातयावेत. ही मागणी सर्व असंघटीत बहुजन कामगार कर्मचारी वर्ग व नागरिकांतून होत आहे. तसेच या प्रकरण् विषयात काहींची दिशाभूल होऊ नये म्हणूनसर्वांना ही माहितीखबर उघड केली जात असण्याचे कारण अशा खराब झालेल्यावातावरणा मधील वास्तव परिस्थितीची मानुसकी नाते सर्वांना ही खरी जाणीवओळखकरून देण्याची सर्वांची जबाबदारी व कर्तव्य् आहे. नसता सर्व जनतेची सतत नुकसान फसवणूक व पिळवणूक सुरू राहीन. तरी अशा अनअधिकृत प्रकाणातील वृतपत्रांनी खरी माहिती प्रिसिद्ध केल्यास शासकीय क्षेत्रात नियंत्रण असलेल्या (काही अपवाद) जातीयवादी व्यवस्था अस्तित्वात असणा-या राजकीय नेता यांच्या हस्तक्षेपाने त्या गावांचे त्या दिवशीचे दैनिक वृतमान पत्र गांवात येऊ दिले जात नसते किंवा इतर शहरामधील हस्तकाकडून दुस-या पर्यायेने षडयंत्र रचले जाऊनव धमकी घालून पेपर आवृती निघणे बंद करतात. यामुळेआपल्या सर्व श्रेष्ठ् भारतीय संविधानकायद्याची आदर्श प्रेरणा घेतलेल्या लोकांकडूनअशा जनहिताच्या कार्याची अंमलबजावणी करायला हे लोककोणत्याच दहशतीला व भीतीला बळी पडत नसतात. वरील संर्भीय माहितीनुसार भारत सरकारने कलम ३५३कायदा हाटविण्याच्या वैद्य शिफारसला मान्यता द्यावी.

**– आयु. रमेश कांबळे**
रा. परतूर जि. जालना मो. ८८०५५८२४८०
जय संविधान! जय भारत ! जय भिम!

***



## मराठा आंदोलकांवरील लाठीचार्जच्या निषेधार्थ बोरीत समाजाच्या वतीने निषेध

लातूर (प्रतिनिधी) :- आंतरवाली सराटी (जि.जालना) येथे मराठा आंदोलनकर्त्यांवर झालेल्या लाठीचार्जच्या निषेधार्थ आज लातूर तालुक्यातील बोरी येथे सकल मराठा समाजाच्या वतीने पुकारण्यात आलेल्या बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद देत निषेध करण्यात आला.

जालना येथे झालेल्या घटनेचा निषेध करण्यासाठी बोरी येथील सकल मराठा समाजाच्या वतीने सार्वजनिक बंदचे आवाहन करण्यात आले होते, त्याला प्रतिसाद देत गावातील शाळा, महाविद्यालये, दुकाने बंद ठेवण्यात आली. सोमवारी सकाळी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे छत्रपती शिवरायांना वंदन करुन गावात निषेध फेरी काढण्यात आली. यावेळी शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करणा-या मराठा आंदोलकांवर लाठीमार करणा-यांच्या निषेधार्थ घोषणा देण्यात आल्या. लोकनेते विलासराव देशमुख चौक येथे फेरीचा समारोप करण्यात आला. यावेळी पोलिस बंदोबस्तही ठेवण्यात आला होता.

यावेळी बाबासाहेब कदम, गावचे उपसरपंच शंकरराव पाटील, दगडूसाहेब पडिले, बोगदाद सगरे, माजी उपसरपंच फरमान शेख, कमलाकर अनंतवाड, संजय भोसले, बजरंग खुर्दळे, आकाश कदम, विजय भालके, संदीप कदम, नानासाहेब पाटील, अमर आगराळे, दिलीप पेदाटे, सतिश बिराजदार, प्रकाश पाटील, विजय पाटील, यशवंत कदम, मधुकर शिंदे, निसार शेख, संतोष भोसले, पांडूरंग कदम आदी उपस्थित होते.



## लाठी हल्याच्या निषेधार्थ औराद शहाजानी कडकडीत बंद

निलंगा (प्रतिनिधी) : जालना जिल्ह्यात झालेल्या मराठा समाजाच्या आंदोलकावर पोलिसांनी केलेल्या लाठीचार्जचा निषेध म्हणून दि ४ सप्टेंबर सोमवारी रोजी निलंगा तालुक्यातील औराद शहाजानी शहर कडकडीत बंद पाळण्यात आला. शहरातील विविध २२ व्यापारी संघटना आडत बाजार यांच्यासह सर्व शैक्षणिक संस्थांनी बंदमध्ये पांठिबा देत सक्रिय सहभाग नोंदवला. शहरातील आडत बाजार सुवर्णकार सराफ बाजारपेठ, जनरल स्टोअर्स, कपडा ,किराणा आदी बावीस व्यापारी संघटना सह शैक्षणिक संस्थांनी बंदला पांठिबा देत सहभाग नोंदवला. सकाळी शहरातून सकल मराठा समाजाच्या वतीने दुचाकी रॅली मुख्य रोड बसस्थानक बालाजी मंदिर, भवानी मंदिर, गांधी चौक, विवेकानंद चौक, आडत मार्केट मार्गे लातूर-जहिराबाद महामार्गावरील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आल्यानंतर आंदोलकांनी महाराष्ट्र सरकारचा निषेधाच्या घोषणा दिल्या.

यावेळी पद्मसिह पाटील, छावाचे भगवान माकणे, कन्हैया पाटील, लखण बोडंगे, शिवाजी शेटगार, ंडिगबर अंतरेड्डी, अर्जुन मेहकरे, माधव गाडे अंकुश भंडारे, विलास कांबळे, कृष्णा गाडे, राहुल पाटील, शाम पाटील, अभिषेक बिरादार मनोज भंडारे, भरत दापके, अमोल पाटील, रवींद्र भंडारे, रोहीत शिंदे, बिरादार सुरज भंडारे आदेश भंडारे, प्रदीप उगिले, संभाजी गाडे, वैभव बेलुरे, संतोष बोडंगे, सिध्दु शिवणे, आशीष थेटे, आदीत्य पवार, ज्ञानेश्वर बोंडगे आदी नागरिक आंदोलनात सहभागी झाले होते.

## मराठा आरक्षण आंदोलनास लातूर शहर जिल्हा काँग्रेस आणि जिल्हा काँग्रेसचा सक्रिय पाठिंबा

**लातूर** (प्रतिनिधी) - मराठा आरक्षणासाठी जालना जिल्ह्यातील अंतरावली येथे सुरू असलेले आंदोलन मोडीत काढण्यासाठी राज्य सरकारने केलेल्या कृतीचा लातूर शहर जिल्हा काँग्रेस आणि लातूर जिल्हा काँग्रेसच्या वतीने तीव्र शब्दात निषेध व्यक्त केला असून मराठा समाजाच्या आंदोलनाला सक्रिय पाठिंबा जाहीर केला आहे.

मराठा समाजाला आरक्षण मिळवून देण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारकडून वेळकाढू धोरण अवलंबण्यात येत आहे. या संदर्भाने मराठा समाजाकडून वेळोवेळी करण्यात येत असलेल्या आंदोलनाच्या वेळी सरकारच्या वतीने केवळ आश्वासन दिले जात आहे. या आश्वासनाची पूर्तता मात्र कधीच केली जात नाही. आंदोलन शमावण्यासाठी आश्वासन देणारे नेते कृती मात्र काहीच करत नाही. मराठा समाजाला आरक्षण मिळण्यासाठी राज्य शासनाकडून केंद्राकडे योग्य पद्धतीने पाठपुरावा होत नसल्यामुळे हे आरक्षण रखडले आहे . मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागणीसाठी जालना जिल्ह्यातील अंतरावली येथे समाजाच्या वतीने शांततेच्या मार्गाने उपोषण आणि आंदोलन




सुरू असताना पोलिसांनी तिथे जाऊन बळाचा वापर केला, आंदोलकावर अमानुषपणे लाठी हल्ला केला, अश्रुधुराचा वापर करण्यात आला. हवेत गोळीबारही केला.

मराठा समाजाने आजवर अनेक भव्य मोर्चे काढले परंतु कधीही कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल अशी कृती केली नाही . असे असताना अंतरावली येथे आंदोलकांवर पोलिसांकडून लाठी हल्ला करण्याचा सरकारचा हेतू स्पष्ट झालेला नाही, सरकारच्या या कृतीचा निषेध करण्यासाठी राज्यभरात समाजाच्या वतीने आंदोलन करण्यात येत आहे, लातूर जिल्ह्यातील समाज बांधवांकडूनही ठिकठिकाणी बंद पुकारण्यात येत आहेत, आंदोलने करण्यात येत आहेत, या संपूर्ण आंदोलनाला लातूर शहर जिल्हा काँग्रेस व लातूर जिल्हा काँग्रेसचा पाठिंबा असल्याचे संयुक्त पत्र लातूर शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष ॲड. किरण जाधव आणि लातूर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष श्रीशैल उटगे यांनी प्रसिद्धीस दिले आहे, मराठा समाजाला कायद्याच्या कसोटीवर टिकणारे आरक्षण मिळवून देण्यासाठी काँग्रेस पक्ष कटिबद्ध असून, पक्षाचे नेते माजी मंत्री अमित विलासराव देशमुख, आमदार धीरज देशमुख यांनी विधानसभेत तसेच योग्य व्यासपीठावरून आवाज उठवलेला आहे त्यांच्यामार्फत यासाठीचा पाठपुरावा सुरू आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळेपर्यंत पक्षाच्यावतीने जे जे करणे शक्य आहे ते सर्व काही पक्षाच्या वतीने करण्यात येत आहे असेही या प्रसिद्धिपत्रकात म्हटले आहे.

## काँग्रेस विधी विभागाच्या पदाधिकाऱ्यांनी घेतले दिलीपराव देशमुख यांचे मार्गदर्शन

**लातूर** (प्रतिनिधी) - महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस विधी विभागाच्या वतीने काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनियाजी गांधी, काँग्रेसचे अध्यक्ष खा.मल्लिकार्जुन खर्गे, काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुलजी गांधी, भारताचे माजी गृहमंत्री शिवराज्य पाटील चाकूरकर सहकार महर्षी तथा माजी मंत्री दिलीपरावजी देशमुख , प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नानाभाऊ पटोले ,विधिमंडळाचे नेते बाळासाहेबजी थोरात,विरोधी पक्षनेते विजयजी वडेट्टीवार,माजी मंत्री तथा लातूर शहरचे आमदार अमितभैय्या देशमुख व लातूर ग्रामीण चे आमदार धिरजभैय्या विलासरावजी देशमुख,महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस विधी विभागाचे अध्यक्ष ॲड.रवी प्रकाश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली लातूर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष श्रीशैल्यदादा उटगे, लातूर शहर काँग्रेसचे अध्यक्ष ॲड. किरण जाधव यांच्या शुभहस्ते विधी विभागाच्या नूतन पदाधिकाऱ्यांना काँग्रेस भवन येथे नियुक्तीपत्र देण्यात आले.



याबद्दल आशियाना येथे सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख यांचे लातूर जिल्हा काँग्रेसच्या विधी विभागाचे नुतन अध्यक्ष अँड प्रवीण हणमंतराव पाटील, लातूर शहर विधी विभागाचे नुतन अध्यक्ष ॲड.सचिन पंचाक्षरी महाराष्ट्र प्रदेश विधी विभागाचे नुतन सचिव ॲड .राजेंद्र काळे व महाराष्ट्र प्रदेश विधी विभागाचे नुतन सचिव ॲड .दौलत दाताळ यांनी भेट घेऊन आभार व्यक्त केले व मार्गदर्शन घेतले.

यावेळी लातूर ग्रामीण मतदारसंघाचे माजी आमदार ॲड. त्र्यंबकनाना भिसे,महाराष्ट्र राज्य साखर संघाचे संचालक आबासाहेब पाटील, संत शिरोमणी मारुती महाराज साखर कारखान्याचे अध्यक्ष गणपतरावजी बाजूळगे, इंदिरा सूतगिरणीचे चेअरमन बाळासाहेब कदम, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे माध्यम विभागाचे सरचिटणीस हरीराम कुलकर्णी,जिल्हा सेवा दलाचे अध्यक्ष सुपर्ण जगताप, संभाजीराव सूळ, रेणा साखरचे संचालक संभाजी रेड्डी,स्नेहल देशमुख, मांजरा चे संचालक बंकट कदम, सचिन पाटील रामदास पवार , दयानंद बिडवे, सतीश पाटील वडगावकर चेअरमन बालाजी भोसले, जिल्हा काँग्रेसचे समन्वयक सचिन दाताळ शिवाजी कांबळे, ॲड सुनील गायकवाड,ॲड हंसराज सोमवंशी, ॲड.सागर वाघमारे, ॲड शरद पवार, ॲड.संदिप मोरे, विकास देशमुख, अजय कोद्रे, सुनील गुरनाळे,रमेश देशमुख, बप्पा मार्डीकर विजय कदम,अमोल भिसे,राहुल देशमुख आदी उपस्थित होते.

## साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त फकिरा पँथर आयोजीत माणुसकीवर परिषद २०२३ संपन्न



नवी मुंबई/के.एच.हनवते : दिनांक ३/९/२०२३ रोजी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०३ व्या जंयती उत्सवानिमित्त फकिरा पँथर सामाजिक संघटना आयोजित माणुसकी परिषद - २०२३ हा कार्यक्रम साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक भवन जुईनगर या ठिकाणी आयोजीत करण्यात अला होता त्यावेळी या कार्यक्रमास ठाणे लोकसभेचे माजी खासदार श्री. संजीवजी नाईक, व लहुजी शक्ती सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. विष्णभाऊ कसबे, क्रांतीज्योती कुसुमताई गोपले, (भाजप) उत्तर भारतीय सेलचे श्री. राजेशजी राय, माजी नगरसेवक श्री. शशिकांतजी भोईर, श्री राजेशजी शिंदे, श्रीम. काशीबाई लांडगे, मा. परिवहन सदस्य श्री. राजेंद्र ईंगळे, श्री. जर्नाधन सुतार, श्री. आनंद शिंदे, शितलताई ईगंळे, इत्यादी नेते कार्यकर्ते व प्रचंड प्रमाणात मातंग समाज बाधंव, भगिनी, विद्यार्थी, उपस्तिथ होते.

## बाजार समित्या सक्षमीकरणासाठी प्रयत्न करणार - संतोष सोमवंशी




शिर्डी :- महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाची ५४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सभापती बाळासाहेब नाहटा यांच्या अध्यक्षतेखाली, उपसभापती संतोष भाऊ सोमवंशी यांच्या उपस्थितीत शिर्डी जिल्हा अहमदनगर येथे संपन्न झाली

यावेळी उपसभापती संतोष सोमवंशी यांनी महाराष्ट्रातील बाजार समित्या सक्षमीकरणासाठी प्रयत्न करणार असे मत व्यक्त केले यापुढे म्हणाले की, पणन सुधारणेमुळे होणाऱ्या संपूर्ण शेतीमालाच्या नियमनमुक्ती नंतर बाजार समित्यांच्या उत्पन्नाचे स्त्रोत कमी होऊन बाजार समित्यांचे उत्पन्न घटणार आहे परिणामी बाजार समित्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण होणार आहे बाजार समित्यांचे अस्तित्व टिकवण्यासाठी आणि सक्षमीकरणासाठी विविध शिफारशी शासनाकडे करणार असे मत महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाचे उपसभापती संतोष भाऊ सोमवंशी यांनी व्यक्त केले.

यावेळी बाजार समिती संघाचे सभापती बाळासाहेब नाहटा,,उपसभापती संतोष सोमवंशी,माजी आमदार केशवराज मानकर, सिंधुदुर्ग जिल्हा बँक अध्यक्ष मनीष दळवी, मुंबई बाजार समिती सभापती अशोकराव डक, पोपटराव सोनवणे, दामोदर नवपुते, आनंदराव जगताप, संजय कामनापुरे ,दिनेश चोखारे, बाबाराव पाटील ,पंढरीनाथ थोरे, संदीप काळे, सौ रंजना कांडेलकर, कार्यकारी संचालक किशोर कुलकर्णी यांच्यासह महाराष्ट्रातील बाजार समितीचे सभापती ,उपसभापती, संचालक प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित राहून अनेक प्रश्नांबाबत ठराव पारित केले अंत्यत खेळीमेळीच्या वातावरणात संघाची ५४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न झाली.

## प्रशांत राजगुरू यांना राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक गुरुगौरव शिक्षकरत्न पुरस्कार

छत्रपती संभाजीनगर : मनुष्यबळ विकास लोकसेवा अकादमी या सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील राष्ट्रीय बाणाच्या उपक्रमशील संस्थेद्वारे संपन्न होत असलेल्या राज्यस्तरीय गुनिजन गौरव महासंमेलन २०२३ या उपक्रमात राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक गुरुगौरव शिक्षकरत्न पुरस्कार २०२३ प्रशांत काशिनाथ राजगुरू सर मु.पो. आसेगाव तालुका गंगापूर. जिल्हा छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) यांना देऊन सन्मानित करण्यात आले आहे. श्री. राजगुरू हे मागील बारा वर्षापासून श्री. बबनराव ढाकणे प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) या ठिकाणी सहशिक्षक म्हणून



कार्यरत आहेत त्यांना हा पुरस्कार मिळाल्याबद्दल राजगुरू परिवार, मित्र मंडळ, नातेवाईक, तसेच सहकारी शिक्षक वर्ग, संस्थेतील पदाधिकारी या सर्वांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## 'पाणी हेच जीवन' आहे; वाहत्या पाण्याला चालायला लावूया, चालणाऱ्या पाण्याला थांबायला लावूया, आणि थांबलेल्या पाण्याला मुरवायला लावूया - जयाजी पाईकराव

**लातूर** (प्रतिनिधी) - माथ्यापासून पायथ्यापर्यंत वाहून जाणारा पडलेल्या पाऊसाचा प्रत्येक थेंब हा जागोजागी अडवला गेला तर जीवसृष्टी अबाधित राहील. असे प्रतिपादन मराठवाड्यातील जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते उगम सामाजिक संस्थेचे अध्यक्ष जयाजी पाईकराव यांनी पर्यावरण विषयी कार्य करणाऱ्या लातूर मधील सामाजिक संस्थांच्या सहका-यांशी बोलताना व्यक्त केले.

बदलत्या प्ररस्थितीत आपण वेळीच सावध होऊन पर्यावरण संवर्धना सोबत पाण्याबाबत सतर्क होणे गरजेचे आहे. पूर्वी नद्या बारमाही वहात असत, त्या आता सिझनल चार सहा महिने वाहत आहेत. नदी पाण्याची निर्मिती करीत नाही तर ती वाहक आहे. तिला वाहती ठेवण्यासाठी नदी संवर्धनाचे कार्य माथा ते पायथा होने गरजेचे आहे. याचे कार्य शासना सोबत जनतेने हाती घेणे काळाची गरज असल्याचे मत जेष्ठ पर्यावरण तज्ञ उगम फाउंडेशनचे अध्यक्ष जयाजी पाईकराव यांनी लातूर येथे व्यक्त केले. विविध सामाजिक संस्थेच्या कार्यकर्त्यांशी संवाद साधताना त्यांनी हे मत



व्यक्त केलं आजच वेळ आहे पाणी वाचवाल तर वाचाल असेही ते म्हणाले.

लातूर मधील पर्यावरण विषयक कार्य करणाऱ्या समविचारी सामाजिक संस्थांनी सह्याद्री देवराई, द लातूर संस्कृती, वसुंधरा प्रतिष्ठान, लातूर वृक्ष चळवळ, माझं लातूर, निसर्ग प्रतिष्ठान, वृक्ष प्रतिष्ठान, कलापंढरी या सामाजिक संस्थांच्या वतीने जयाजी पाईकराव यांचा सत्कार करण्यात आला. हिंगोली जिल्ह्यांमध्ये कळमनुरी तालुक्यात कयाथू आणि आसना नदीच्या खोऱ्यात नैसर्गिक स्थानिक प्रजातीच्या गवताचा अधिवास त्यांनी शेतकऱ्यांच्या मदतीने जतन केला आहे. पवना मारवेल जोंधळी या गवताचा आधिवास जतन केला आहे. या त्यांच्या कार्याची पाहणी करण्यासाठी पर्यावरण विषयक शास्त्रज्ञ श्री माधव गाडगीळ यांनीही कयाथु नदीच्या खोऱ्यात विविध गावांना भेट दिली. आज लातूरहून हिंगोलीला जात असताना श्री जयाची पाईकराव यांचा सत्कार पर्यावरण विषयात कार्य करणाऱ्या सर्व संस्थांनी केला या सत्काराला उत्तर देताना ते म्हणाले पाण्याचा प्रत्येक थेंब मुरवायला हवा.सी सी टी माथ्याजवळ पायथ्याजवळ खोल सीसीटी खूप महत्त्वाची आहे. पाण्याचा थेंब आडवला तर वनस्पती ह्या जगतील टीकतील.

लातूर येथील सह्याद्री देवराई पावसाच्या पाण्यावर यामुळेच यशस्वी झाली आहे , सीसीटी मुळेच स्थानिक प्रजातीचे वृक्ष तेथे टिकले आहेत. अश्या प्रकारचे कार्य सर्व ठिकाणी व्हायला हवे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT NO. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE